आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१२ जानेवारी २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या जिल्हा परिषद निवडणुका १५ फेब्रुवारीपर्यंत घेण्याची मुभा निवडणूक आयोगाला देण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा निधी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यासंदर्भात निवडणूक आयोगाची मुख्य सचिवांना नोटीस

- भारत आणि जर्मनीमध्ये १९ सामंजस्य करार

**आणि**

- चांदी किलोमागे १४ हजार रुपयांनी महाग, शेअर बाजारातही तेजी

**<><><><>**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांची निवडणूक प्रक्रिया १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयानं आज दिली. मतदान यंत्रांची कमतरता, प्रशासकीय अडचणी यासारखी कारणं देत राज्य निवडणूक आयोगानं ३१ जानेवारीची मुदत १० फेब्रुवारीपर्यंत वाढवून द्यावी, अशी विनंती केली होती. आरक्षण मर्यादा न ओलांडलेल्या १२ जिल्हापरिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांची निवडणूक १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं आज दिले.

**<><><><>**

महानगरपालिकांच्या निवडणुकीत ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या गृहमतदानाबद्दल राज्य निवडणूक आयोगाकडून कोणत्याही सूचना मिळालेल्या नाहीत. त्यामुळे तशी सोय करण्यात आलेली नाही, असं स्पष्टीकरण नागपूर महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉक्टर अभिजित चौधरी यांनी केलं. महानगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत ते आज बोलत होते. ज्येष्ठ नागरिक,

दिव्यांग मतदार, गर्भवती महिला यांना प्राधान्याने मतदान करता येईल. त्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मदत करणार आहेत. मतदारांना त्यांचं नाव आणि मतदान केंद्र हे मताधिकार ॲपच्या माध्यमातून शोधता येऊ शकतं, अशी माहिती चौधरी यांनी दिली.

<><><><>

ठाणे महानगरपालिका निवडणुकीसाठी आज शिवसेनेने आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. ठाणे झोपडपट्टीमुक्त केलं जाईल, २६० मीटर उंचीचा व्हूइंग टॉवर उभारला जाईल, अशी आश्वासनं यात देण्यात  आली. मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के यावेळी उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिकांसाठी ‘आरोग्य आपल्या दारी’ ही योजना राबवली जाईल, पाणीटंचाईचा प्रश्न सोडवला जाईल, असं सरनाईक यावेळी म्हणाले. भाजपा आणि शिवसेनेने वेगवेगळे जाहीरनामे प्रसिद्ध केले असले तरी दोन्ही पक्ष एकत्र निवडणूक लढत आहेत, असं खासदार नरेश म्हस्के यांनी स्पष्ट केलं.

<><><><>

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत डिसेंबर आणि जानेवारी महिन्याची रक्कम मकरसंक्रांतीच्या आधी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होईल, असा दावा मंत्री गिरीश महाजन यांनी केल्याप्रकरणी राज्य निवडणूक आयोगानं राज्याच्या मुख्य सचिवांकडून अहवाल मागवला आहे. हा आदर्श आचारसंहितेचा भंग असल्याचा आरोप करून काँग्रेसनं याविरुद्ध तक्रार केली होती. महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा हा प्रयत्न असल्याचं काँग्रेसचं म्हणणं आहे. तर दुसरीकडे, आदर्श आचार लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा होण्यात विलंब होईल, अशी माहिती महिला आणि बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

<><><><>

मुंबई महानगरपालिका निवडणुकीतल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवार किशोरी पेडणेकर यांनी गुन्ह्याची माहिती लपवल्याबद्दल त्यांची उमेदवारी रद्द करावी या मागणीसाठी शिवसेनेचे प्रवक्त्या सुशीबेन शाह यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर तात्काळ सुनावणी घ्यायला नकार देत मतदानाला काहीच दिवस शिल्लक असल्यामुळे मतदान झाल्यावर सुनावणी घेतली जाईल, असं न्यायालयानं सांगितलं.

<><><><><>

वंचित बहुजन आघाडीसोबत काँग्रेसची युती ही केवळ राजकीय आघाडी नाही तर विचारांचा मेळ आहे, असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे.ते आज महानगरपालिका प्रचारासाठी सोलापुर दौऱ्यावर असताना बातमीदारांशी बोलत होते. मुंबई, लातूर आणि नांदेडमध्ये आमची आघाडी आहे, ती पुढे घेऊन जाण्याची गरज आहे, असं ते म्हणाले. काँग्रेस पक्ष भांडवलदारांच्या विरोधात नाही पण मोदी सरकार ज्या पद्धतीने देशातल्या सर्वच क्षेत्रात अदानीला मुक्तहस्ते संचार करु देत आहे, ते देशासाठी अत्यंत घातक आहे, अशी टीका सपकाळ यांनी केली.

<><><><><>

कोणीही मतदारांकडे येऊन वेगळा पाठिंबा असल्याचा दावा केला, तर मतदारांनी भुलू नये, आपल्या पक्षाचा पाठिंबा फक्त महायुतीच्या अधिकृत उमदेवारांना आहे, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितलं. ठाणे महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारसभेत ते बोलत होते. या निवडणुकीत फक्त उमेदवार निवडायचे नाहीत, तर ठाण्याच्या विकासाची दिशा ठरवायची आहे, त्यामुळे महानगरपालिकेवर महायुतीचा भगवा फडकायलाच हवा, असं प्रतिपादन त्यांनी केलं. ठाण्याच्या विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**<><><><>**

राज्यात महापालिका निवडणुका होत आहेत. या अनुषंगाने प्रत्येक सजग आणि सुजाण नागरिकाने येत्या १५ तारखेला आपला मतदानाचा हक्क बजावावा आणि सुयोग्य उमेदवाराला निवडून द्यावं, असं आवाहन अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांनी केलं आहे.

**- होल्ड.. बाईट - रोहिणी हट्टंगडी - -**

**<><><><>**

अंबरनाथ नगरपरिषदेच्या उपाध्यक्षपदी शिवसेनेच्या समर्थनाने राष्ट्रवादी काँग्रेसचे सदाशीव पाटील यांची आज निवड झाली. आज झालेल्या सर्वसाधारण सभेत खुलं मतदान करून नगरसेवकांनी ही निवड केली. शिवसेना महायुती विकास आघाडीला ३२ तर अंबरनाथ विकास आघाडीला २८ मतं मिळाली. दरम्यान, निवडीच्या प्रक्रियेदरम्यान भाजपा आणि शिवसेनेच्या नगरसेवकांमधे वाद झाल्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती.

**<><><><>**

जर्मनीचे चान्सलर फ्रेडेरिक मर्झ यांच्या भारत दौऱ्यादरम्यान आज भारत आणि जर्मनी या दोन देशांमध्ये १९ महत्त्वाचे सामंजस्य करार आणि ८ महत्त्वाच्या घोषणा झाल्या. भारताचा पासपोर्ट असलेल्यांना जर्मनीत व्हिजामुक्त प्रवास, तसंच भारतीय आरोग्य कर्मचाऱ्यांना नोकऱ्या देण्यासाठी नवा आराखडा यांचा यात समावेश आहे. द्विपक्षीय औद्योगिक सहकार्य वाढवणं, तसंच व्यापार आणि गुंतवणुकीला चालना देण्यासाठी एका मुख्य कार्यकारी अधिकारी मंचाच्या स्थापनेबाबत संयुक्त इरादापत्रावरही आज स्वाक्षरी झाली. चान्सलर मर्ज यांच्या भेटीदरम्यान संरक्षण, व्यापार, कौशल्य, शाश्वत ऊर्जा आणि नागरिकांमधले संबंध इत्यादी क्षेत्रांमध्ये परस्पर सहकार्य वाढवण्याच्या दिशेनं महत्त्वाची पावलं उचलल्याचं प्रतिपादन परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी वार्ताहर परिषदेत केलं.

नवीकरणीय ऊर्जा, हरित हायड्रोजन आणि हरित आणि शाश्वत विकास भागीदारीअंतर्गत जर्मनीनं १२४ कोटी युरोचं अर्थसहाय्य द्यायची घोषणा केली.

<><><><><>

मुंबईच्या सराफा बाजारात चांदी आज किलोमागे तब्बल १४ हजार रुपयांनी महागली. त्यामुळं एक किलो चांदीसाठी २ लाख ६४ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम मोजावी लागत होती. सोन्याचे दरही तोळ्यामागे सव्वा ३ हजार रुपयांनी वाढले. त्यामुळं एक तोळा २४ कॅरेट सोनं १ लाख ४४ हजार रुपयांपेक्षा अधिक किमतीला मिळत होतं. तर २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ४१ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम द्यावी लागत होती.

सकाळच्या सत्रात घसरलेले शेअर बाजार दुपारनंतर झपाट्यानं वधारले. त्यामुळं व्यवहारादरम्यान ८३ हजारांच्या खाली गेलेला सेन्सेक्स दिवसअखेर ३०२ अंकांची वाढ नोंदवून ८३ हजार ८७८ अंकांवर बंद झाला. निफ्टी १०७ अंकांनी वधारून २५ हजार ७९० अंकांवर बंद झाला. भारत-अमेरिका व्यापार करार होण्याची आशा, स्वस्तात मिळत असलेल्या समभागांची खरेदी यासारख्या कारणांनी बाजारात आज तेजी होती.

दरम्यान महापालिका निवडणुकांच्या मतदानामुळं गुरुवारी देशातले शेअर बाजार बंद राहणार आहे.

<><><><><>

रत्नागिरील्या शासकीय रुग्णालयाजवळ पोलिसांनी काल ३० ग्रॅम अंमली पदार्थ जप्त केले. याप्रकरणी पोलिसांनी चौघांना ताब्यात घेतलं असून त्यांच्याकडून साडे ३ लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

<><><><><>

महिलांच्या प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा सामना यूपी वॉरियर्सशी होणार आहे. नवी मुंबईत डॉ. डी. वाय. पाटील मैदानावर आज

संध्याकाळी साडे सात वाजता या सामन्याला सुरुवात होईल. रॉयल चॅलेंजर्स संघानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

धुळे महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस प्रशासनाने अवैध कृत्यांविरुद्ध विशेष मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने आज देवपूर भागात एका गाडीतून होणारी बेकायेदशीर मद्यवाहतूक रोखली. या कारवाईत पोलिसांनी मद्यसाठा आणि गाडीसह एकूण ८ लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**//<><><><><>//**